डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ व सलंग्न संस्थेतील अधिकारी कर्मचा-यांना नोव्हेबर,२०२५ ते जानेवारी, २०२६ या कालावधीत अनुज्ञेय महागाई भत्ता वाढीची थकबाकी मंजूर करण्याबाबत.

# डॉ .पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## अर्थ प्रशासन विभाग

---

वाचा : १) या विभागाचे आदेश.क्र. निमवा/२०२५-२६/३१४१ ,दि.१३/०३/२०२६.
२) वित्त विभाग शासन निर्णय.क्र. मभवा-१३२५/प्र.क्र.१९/ सेवा-९, दि. १८ मे,२०२६.
३) वित्त विभाग शासन निर्णय.क्र. निमवा-२०२६/ प्र.क्र.१४/ सेवा-४, दि. १९.०५.२०२६ .

## आदेश

जा.क्र. अप्रवि/मभवा/निमवा/२०२६-२७/ २६५ दि. २०/०५/ २०२६.

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये विद्यापीठातील व विद्यापीठाशी संलग्न अनुदानित संस्थेतील सुधारीत वेतन संरचनेतील ( ७ व्या वेतन आयोगानुसार) अधिकारी / कर्मचा-यांना व निवृत्ती वेतन/ कुटूंब निवृत्तीवेतन धारकांना निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतन रकमेवर ३ % दराने महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे म्हणजेच त्यावेळच्या ५५ % महागाई भत्त्या ऐवजी वेतन व निवृत्ती वेतनाच्या / कुटूंब निवृत्ती वेतनाच्या ५८ % महागाई भत्ता वाढ मंजूर करण्यात येऊन १ फेब्रुवारी,२०२६ पासुन सदर महागाई भत्ता वाढ रोखीने देण्यात यावी, तसेच जुलै २०२५ ते ऑक्टोंबर २०२५ या कालावधीतील थकबाकी मार्च २०२६ या महिन्यात रोखीने अदा करण्यात यावी व उर्वरीत कालावधीतील थकबाकीचे ( नोव्हेबर,२०२५ ते ३१ जानेवारी, २०२६ या कालावधीचे) आदेश स्वतंत्र निर्गमित करण्यात येतील, असे कळविले होते.

आता संदर्भ २ व ३ शासन निर्णयान्वये १ नोव्हेबर,२०२५ ते ३१ जानेवारी, २०२६ या तीन महिन्यांच्या कालावधीतील अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम माहे मे,२०२६ देय जुन,२०२६ चे नियमित वेतन/ निवृत्तीवेतन देयकात रोखीने अदा करावी किंवा त्या पुढील नियमित मासिक वेतन देयकात समावेश करावा मात्र याबाबत पुरवणी देयक सादर करु नये अशी पुरवणी देयके पारीत केली जाणार नाहीत. महागाई भत्ता वाढीच्या थकबाकी अनुषंगाने होणारा वाढीव खर्च हा सन २०२६-२७ चे मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

भा.कृ.अ.प. योजनांतर्गत सन २०२६-२७ करीता वेतन अनुदानाची मागणी करतांना संबंधीत कार्यान्वयन अधिका-यांनी प्रस्तुत महागाई भत्ता थकबाकी विचारात घेऊन त्यानुसार वेतन अनुदानाची मागणी करावी. द्वितीय सहामाही करीता अनुदानाची मागणी यापुर्वी केलेली असल्यास महागाई भत्त्याच्या थकबाकी तरतुदीसाठी स्वतंत्र वाढीव मागणी प्रस्ताव सबंधित कार्यान्वयन अधिका-यांनी भा.कृ.अ.प.स त्वरीत सादर करावा.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

पुढील पानांवर........

R.RAUT Bud

१) नियंत्रण अधिकारी (सर्व) / आहरण व संवितरण अधिकारी (सर्व) / विभागप्रमुख(सर्व),डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला.
------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------.

२) प्राचार्य______________________________________________

३) अधिदान व लेखा अधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला/ नागपूर.

यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतन धारकांना वरील कालावधीची महागाई भत्ता थकबाकी रक्कम रोखीने माहे मे,२०२६ देय जुन,२०२६ चे नियमित मासिक वेतन / निवृत्ती वेतन देयकात प्रदान करण्यात यावी. महागाई भत्ता अदा करण्यासाठी निवृत्ती वेतन अथवा वेतनाचे स्वतंत्र पुरवणी देयके आपण पारीत करु नये.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

Inward No. 133
Dt. 4/6/2026

R.RAUT Bud